# —:प्रेस नोट:—

## अतिसंवेदनशिल नक्षलग्रस्त भागातील ग्राम महसुल अधिकारी कार्यालय गोठणगांव येथील ग्राम महसुल अधिकारी कु. सुलोचना कन्नाके यांचेवर ॲन्टी करप्शन ब्युरो गडचिरोलीची कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | गडचिरोली |
|---|---|
| पोलीस ठाणे, अप क्रं. दाखल दिनांक व वेळ | पोस्टे कुरखेडा येथे अप क्रं. ४९/२०२६ दिनांक२६/०२/२०२६ रोजीच्या २१:२४ वा. दाखले |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव व पद | महीला आलोसे कु. सुलोचना विठ्ठलराव कन्नाके, पद—ग्राम महसूल अधिकारी नेमणुक— ग्राम महसूल अधिकारी कार्यालय, गोठणगांव ता. कुरखेडा (वर्ग—३) |
| कायदा कलम | कलम—७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५००/—रू. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५००/—रू. |

**थोडक्यात हकिकत**

गडचिरोली जिल्हयातील महसुल विभागाच्या ग्राम महसूल अधिकारी कार्यालय, गोठणगांव ता. कुरखेडा येथील ग्राम महसुल अधिकारी आलोसे कु. सुलोचना विठ्ठलराव कन्नाके, वय ३८ वर्षे, (वर्ग—३) यांना ५००/— रुपयांची लाच रक्कम स्विकारतांना ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोलीच्या पथकाने त्यांचे घरून रंगेहाथ पकडले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार यांनी त्यांचे नावे असलेल्या वनपटटयाच्या शेतजमिनीचा ७/१२ ऑनलाईन करण्याकरीता अर्ज केल्यानंतर तक्रारदार यांनी ग्राम महसुल कार्यालय गोठणगांव येथे जावून आलोसे यांना ऑनलाईन ७/१२ सही शिक्यानिशी प्रत मागणी केली असता, आलोसे यानी ऑनलाईन ७/१२ काढून सही शिक्यानिशी प्रत देण्याचे कामाकरीता महीला आलोसे यांनी स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता आपल्या पदाचा दुरूपयोग करून वाम व भ्रष्ट मार्गाने ५०० रू. लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथे दिनांक २५/०२/२०२६ रोजी तक्रार दिली होती. सदर तक्रारीची पोलीस उपअधिक्षक श्री. विक्रांत सगणे ला.प्र.वि. गडचिरोली यांनी अतिसंवेदनशिल असलेल्या नक्षलग्रस्त भागातील गोठणगांव येथे दिनांक २५/०२/२०२६ रोजी पंचासह जावुन अत्यंत गोपनीयरित्या शहानिशा करून पडताळणी केली असता, महीला आलोसे कु. सुलोचना विठ्ठलराव कन्नाके यांनी तक्रारदाराकडे ५००/— रूपयांची मागणी करून दिनांक २६/०२/२०२६ रोजी लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली होती.

त्याअनुषंगाने दिनांक २६/०२/२०२६ रोजी सापळा कारवाईचे आयोजन केले असता, तक्रारदार यांचे नावे असलेल्या वनपटटयाच्या शेतजमिनीचा ऑनलाईन ७/१२ करून सही शिक्यानिशी प्रत देणेकरीता महीला आलोसे नामे कु. सुलोचना विठ्ठलराव कन्नाके हया ५००/— रुपये लाच रक्कम स्विकारतांना त्यांचे राहते घरी रंगेहाथ मिळून आल्याने त्यांचेविरूध्द पोस्टे, कुरखेडा येथे दिनांक २६/०२/२०२६ रोजी अप. क्रं. ४९/२०२६ कलम ७ भ्र. प्र.अधि. १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक श्री. संतोष पाटील हे करीत आहेत.

**१) सापळा अधिकारी:—** पोलीस उपअधिक्षक श्री. विक्रांत सगणे, ला. प्र. वि. गडचिरोली

**२) पर्यवेक्षण अधिकारी:—** पोलीस उपअधिक्षक श्री. विक्रांत सगणे, ला. प्र. वि. गडचिरोली

**३) सापळा पथक :—** सहाफौ. सुनिल पेद्दीवार, पोहवा किशोर जौंजारकर, पोहवा राजु पद्मगीरीवार, पोहवा स्वप्नील बांबोळे, पो.अ. संदिप घोरमोडे, प्रविन जुमनाके, नुतेश धुर्वे, मपोशि/विद्या म्हशाखेत्री, मपोशि/ज्योत्सना वसाके व चापोना राजेश्वर कुमरे, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली

**४) तपासी अधिकारी:—** पो.निरी श्री. संतोष पाटील, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली.

**मार्गदर्शन अधिकारी:—**

१) मा. डॉ. श्री. दिगंबर प्रधान, पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर परीक्षेत्र,

२) मा. श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपूर, मा.

३) मा. श्री. विजय माहुलकर अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपुर

गडचिरोली जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजंट) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली यांचेशी सपंर्क साधावे असे आवाहन. पोलीस उपधिक्षक श्री.विक्रांत सगणे यांनी केले आहे.

पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, गडचिरोली
मोबाईल/व्हॉटसॲप क्रमांक — ७५८८०४१०६४
दुरध्वनी क्रमांक — ०७१२—२९५०२० टोल फ्रि क्रमांक — १०६४

(विक्रांत सगणे)
पोलीस उपअधीक्षक
ला.प्र.वि.गडचिरोली